**कार्यानुभव (Internship) व ऑन-द-जॉब-ट्रेनिंग संधी मेळावा योजना :**

१) NEP 2020 च्या प्रभावी अंमलबजावणीच्या दिशेने, विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार कार्यक्रमांतर्गत, संलग्नित महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांमध्ये कार्यानुभव (Internship ) व ऑन-द-जॉब-ट्रेनिंग संदर्भात जागरूकता व संवेदनशीलता निर्माण करण्यासाठी कार्यशाळा आयोजित करण्यासाठी प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. यामध्ये स्थानिक उद्योग प्रमुखांना आमंत्रित करण्यात यावे. सदरील कार्यशाळा उद्योगांची संघटना/एमआयडीसी अशा संस्थांच्या सहकार्याने घेण्यात यावी. उद्योगांचे प्रतिनिधी विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याच्या दृष्टीने एका सभागृहामध्ये सदर मेळाव्याचे आयोजन करण्यात यावे. कार्यक्रमाची सुरूवात विद्यापीठ गीताने करण्यात यावी.

**२) कार्यशाळेची उद्दिष्टे खालीलप्रमाणे :**

१) इंटर्नशिप आणि ऑन–द–जॉब–ट्रेनिंग (OGT) अनुलंब संदर्भात जागरूकता निर्माण करणे.

२) रोजगारक्षमतेसाठी या इंटर्नशिप आणि ऑन–द–जॉब–ट्रेनिंग (OJT) ची गरज आणि महत्व स्पष्ट करणे.

३) स्थानिक उद्योग, एसएमई, सरकारी कार्यालये, एनजीओ इत्यादींशी कनेक्ट होणे.

**३) योजनेसाठी विद्यापीठाकडून मिळणारे अनुदान :**

या योजनेसाठी विद्यापीठाकडून देण्यात येणारे अनुदान खालीलप्रमाणे

| अ. क्र. | विषय | सहभागी उद्योजक/कंपन्यांची संख्या | विद्यापीठाकडून देण्यात येणारे अर्थसहाय्य |
|---|---|---|---|
| १ | इंटर्नशिप आणि ऑन–द–जॉब–ट्रेनिंग (OJT) | कमीत कमी २५ | रू.२०,०००/– |
| २ | | कमीत कमी ५० | रू.३०,०००/– |

**४) किमान विद्यार्थ्यांची उपस्थिती संख्या** : १०० विद्यार्थी

**५) कार्यशाळेचे स्वरूप व कालावधी :**

१) कार्यशाळेचे उद्घाटन – १०–१५ मिनिटे **(सुरूवात विद्यापीठ गीताने)**

२) ४५ मिनिटांचे प्रत्येकी दोन सत्रे

३) कार्यशाळा समारोप – १०–१५ मिनिटे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ नियोजन व विकास पुणे-७

